नॅक समितीतर्फे "अ" दर्जा प्राप्त

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## ६१ वा दीक्षांत समारंभ

**(उपस्थितीत व अनुपस्थितीत पदव्यांचा अनुग्रह करण्यासाठी पदवी आवेदनपत्राबाबत)**

या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०१९ आणि मार्च/एप्रिल, २०२० मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत उत्तीर्ण व पदवीस पात्र स्नातकांना त्या-त्या पदव्यांचा अनुग्रह करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षांत समारंभाचे जून २०२१ च्या शेवटच्या आठवड्यामध्ये आयोजन करण्यात येत आहे.

त्यास्तव पदवीस पात्र स्नातकांना उपस्थितीत व अनुपस्थितीत पदव्यांचा अनुग्रह करण्यासाठी पदवी आवेदनपत्र मागविण्यात येत आहे.

- करिता, ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०१९ आणि मार्च/एप्रिल, २०२० मध्ये उत्तीर्ण झालेल्या व त्या-त्या पदवीस पात्र अशा स्नातकांनी पदवी आवेदनपत्र **दिनांक १० जून २०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत विद्यापीठाच्या परीक्षा विभागात टपालाने किंवा कुरिअरने प्राप्त होतील या बेताने पदवी आवेदनपत्रासाठी लागणाऱ्या सर्व आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करावीत.**
- **जे स्नातक पदवीस पात्र आहेत, व ज्यांनी परीक्षा आवेदनपत्रासोबत पदवी आवेदनपत्र सादर केलेली आहेत, अशा स्नातकांनी पून्हा आवेदनपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही, तथापि, अशा स्नातकांची यादी संपूर्ण विवरणासह महाविद्यालयांनी विद्यापीठात सादर करणे आवश्यक आहे.**
- **ज्यांनी यापूर्वी पदवी आवेदनपत्र भरलेले नाहीत, अशा नवीन आवेदनपत्र भरणाऱ्यांनी बँक चलनद्वारे ऑनलाईन शूल्क सादर करुन चलनाची प्रत आवेदनत्रासोबत टपालाने / कुरिअरने पाठवावी.**

पदवी आवेदनपत्राच्या शुल्कासंबंधीचे विवरण खालीलप्रमाणे आहे :

| अ.क्र. | पदवीचा तपशिल | पदवी प्रमाणपत्रासाठीचे शुल्क रुपये | महाराष्ट्रातील रहिवाशांसाठीचे टपाल शुल्क | महाराष्ट्राबाहेरील रहिवाशी असलेल्यांसाठीचे टपाल शुल्क |
|---|---|---|---|---|
| १. | पदवी व पदविका अभ्यासक्रम | २००/- | ५०/- | १००/- |
| २. | पदव्युत्तर अभ्यासक्रम | ३००/- | ५० | १००/- |
| ३. | पदव्युत्तर अभ्यासक्रमानंतरचे अभ्यासक्रम | ५००/- | ५०/- | १००/- |
| ४. | पीएच.डी. प्रमाणपत्र | ६००/- | ५०/- | १००/- |

उपरोक्त प्रमाणे ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०१९ आणि मार्च/एप्रिल, २०२० मध्ये झालेल्या उत्तीर्ण व पदवीस पात्र अशा स्नातकांनी पदवी आवेदनपत्र सादर करावीत.

विद्यापीठ परिसर, ][
औरंगाबाद ][
संदर्भ क्र. परीक्षा/६१ वा दीक्षात समारंभ/२०२१/83 ][
दिनांक : २१.०५.२०२१ ][

प्रा. योगेश पाटील
संचालक
परीक्षा व मूल्यमापनमंडळ

याची एक प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित :

१. मा. कुलगुरू यांचे सचिवालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
२. मा. प्र-कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
३. मा. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
४. मा. संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसर, उस्मानाबाद
५. सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व उपपरिसर, उस्मानाबाद
६. सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
७. वित्त व लेखाधिकारी, लेखा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
८. सर्व उपकुलसचिव/सहाय्यक कुलसचिव, परीक्षा विभाग

प्रत,
सर्व कक्ष अधिकारी व कक्ष प्रमुख, परीक्षा विभाग